# देव वाईटातून चांगले करतो

**प्रार्थना** प्रिय प्रभू विश्वास ठेवणाऱ्यांसाठी सर्व गोष्टी तू कल्याणकारक कशा करतोस हे मुलांना समजावे यासाठी कृपा करून ह्या अभ्यासाचा उपयोग कर.''

पुढील पैकी कोणतीही एक किंवा सर्व कार्यक्रम शिकविण्यासाठी निवडा.



शक्य असल्यास हे चित्र मुलांकडून रंगवून घ्या.

मोठ्या मुलाने किंवा प्रौढाने प्रे. कृ. 27:13-28:10 मधील वृत्तांत वाचून दाखवावा किंवा सांगावा. देव आपल्या लोकांचा उपयोग अगदी वाईट गोष्टी घडल्या तरी, जगाला सुवार्ता सांगण्यासाठी आणि आशीर्वाद देण्यासाठी कसा करून घेतो हे ह्या वृत्तांतातून दिसते.

मुलांना पुढील प्रश्न विचारा:

- तुफानातही तारवातील लोक मरणार नाहीत हे पौलाला कसे समजले? (उत्तर: पाहा प्रे. कृ. 27:23-25)
- देवाने पौलासाठी कोणती योजना आखली होती? (27:24)
- पौल कोणी देव आहे असे मिलिता येथील लोकांना का वाटले? (28:5-6)
- पौलाने मिलिता बेटावरील लोकांना आरोग्य दिले म्हणून त्यांनी त्याचे आभार कसे मानले? (28:10)
- इतरांचे कल्याण करण्यासाठी देवाने पौलाच्या बाबतीत घडलेल्या वाईट गोष्टीचा कसा उपयोग करून घेतला?

## पौलाचे तारू फुटते ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा.

उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून मुलांना ही नाटिका काही प्रौढांच्या मदतीने सादर करण्याची व्यवस्था करा. सर्व भूमिकांसाठी तुमच्याकडे पुरेशी मुले नसतील तर शेजाऱ्यांच्या मुलांची मदत घ्या, त्यामुळे त्यांनाही ख्रिस्ताची ओळख होण्यास मदत होईल. मुलांनी संवादातील प्रत्येक शब्द जसाच्या तसा पाठ करण्याची आवश्यकता नाही; फक्त काय बोलायचे याची साधारण कल्पना त्यांना असली पाहिजे.

मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात:

- निवेदक वृत्तांताचा थोडक्यात सारांश करून मुलांकडून संवाद पाठ करून घ्या.

- **पौल**
- **पुब्ल्य, पौलाला आमंत्रण देणारा.**

लहान मुलांनी पुढील भूमिका कराव्यात:

- तारवाचा **कप्तान**
- तारवावरील **खलाशी**
- शेकोटीभोवती जमलेले मिलिताचे **लोक.**

### नाटिका, भाग 1: तुफान ( प्रे. कृ. 27:13-30 )

**निवेदक:** प्रे. कृ. 27:13-30 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''खलाशी काय ओरडतात ते ऐका.''

**खलाशी:** ''मोठ्याने ओरडा, ''मला तर या तुफानाची खूप भीती वाटते!'' ''आपण सर्व जण बुडून मरणार!''

**निवेदक:** ''पौल काय म्हणतो ते ऐका''

**पौल:** मोठ्याने ओरडा, ''खलाश्यांनो तुम्ही तारू सोडून जाऊ नका!'' आपण सर्वजण वाचणार आहोत कारण माझ्या देवाने मला एक काम सोपविलेले आहे.''

### नाटिका, भाग 2: तारू फुटते ( प्रे. कृ. 27:31-44 )

**निवेदक:** प्रे. कृ. 27:31-44 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगा आणि म्हणा, ''तारवाचा कप्तान काय ओरडत आहे ते ऐका.''

**कप्तान:** मोठ्याने बोला, ''आपण बुडत आहोत! तारवाचे एखादे फळकुट पकडा! किनाऱ्याच्या दिशेने पोहत जा''

### नाटिका, भाग 3: साप आणि शेकोटी ( प्रे. कृ. 28:1-6 )

**निवेदक:** प्रे. कृ. 28:1-3 मधून वृत्तांताचा तिसरा भाग सांगून म्हणा, ''लोकांचे म्हणणे ऐका''

**लोक** (शेकोटीभोवती बसून) मोठ्याने ओरडा, ''ए, ते बघा तो भयंकर विषारी साप त्याला चावला की!'' ''तो त्याने शेकोटीत फेकला की!'' ''हे काय, त्याचा हात सुजला नाही!''

**पुब्ल्या:** ''त्या सापाने तुम्हाला अजिबात इजा केली नाही, याचे मला फार आश्चर्य वाटते. तुमचा देव बलवान आहे. कृपा करून माझ्या घरी चलावे!''

### नाटिका, भाग 4 पुब्ल्याचे वडील बरे होतात ( प्रे. कृ. 28:7-10 )

**निवेदक:** प्रे. कृ. 28:7-10 मधून चौथा भाग सांगून म्हणा, ''मिलिता येथील लोक काय म्हणतात ते ऐका''

**लोक:** मोठ्याने म्हणा, ''ह्याच्या देवाने आमच्या पुढाऱ्याच्या वडिलांना आरोग्य देऊन बरे केले!'' ''कृपा करून माझ्याकडे चला आणि माझ्या आजारी आईसाठी प्रार्थना करा.'' ''माझ्या भावासाठी येऊन प्रार्थना करा''

**निवेदक:** नाटिका संपल्याचे सांगा. मुलांचे आभार माना आणि नाटिका पाहिल्याबद्दल प्रौढांना धन्यवाद द्या.

**विचारा:** आमच्या जीवनातील वाईट दु:खदायक घटनांचा उपयोग देव चांगल्यासाठी कसा करून घेतो? याची आणखी इतर उदाहरणे सांगा. (मुलांनी किंवा प्रौढांनी उदाहरणे सांगावीत.)

मंडळीच्या पुढाऱ्याशी चर्चा करून मुलांसाठी पुढील गोष्टींची व्यवस्था करा:

- उपासनेच्या वेळी प्रौढांसमोर नाटिका सादर करणे.
- ह्या अभ्यासाच्या आरंभी दिलेले प्रश्न प्रौढांना विचारा.
- त्यांनी तयारी केलेल्या कविता आणि अन्य गोष्टी सादर करा.



**पाठ करा** रोम 8:28

चित्र काढा. शेकोटीत पडणारा साप. मोठ्या मुलांनी लहानांना मदत करावी. मुलांनी काढलेली चित्रे पुढच्या उपासनेच्या वेळी प्रौढांना दाखवावीत आणि यावरून देव सैतानाचा पराभव करतो हे स्पष्ट होते हे स्पष्ट करून सांगा.

**कविता** तीन मुलांनी स्तोत्र 39 मधून ही वचने म्हणावीत:

हे देवा, मला वाचीव, कारण पाणी माझ्या गळ्याशी येऊन भिडले आहे. मी खोल दलदलीत रूतलो आहे, तेथे उभे राहण्यास आधार नाही, मी खोल पाण्यात आलो आहे आणि लोंढा माझ्यावरून जात आहे. आरोळी मारिता मी थकलो आहे, माझा घसा कोरडा पडला आहे.

तुझ्या मंदिराविषयीच्या आवेशाने मला ग्रासून टाकिले आहे, निंदा करणाऱ्यांनी केलेली तुझी निंदा झाली आहे. त्यांनी मला अन्न म्हणून विष खावयास दिले, तहान भागविण्यास मला आंब दिली. आपल्या दासापासून तू आपले मुख लपवू नको, कारण मी संकटांत आहे, माझे सत्वर ऐक, माझ्या जिवाजवळ येऊन त्याचा उद्धार कर, माझे वैरी पाहून माझा उद्धार कर.

मोठ्या मुलांनी, देव वाईट कठीण परिस्थितीतून चांगले घडवून आणतो, याविषयी कविता गीत किंवा छोटी गोष्ट लिहावी अथवा त्याबद्दल साक्ष द्यावी.

**प्रार्थना:** ''प्रिय देवबापा, आमच्या आणि इतरांच्या बाबतीत घडलेल्या वाईट गोष्टींतून तू काहीतरी चांगलेच समोर आणणार असा आमचा तुझ्यावर भरवंसा आहे. वाईट परिस्थितीतही आम्ही आनंदाने समाधानाने तुझी सेवा करीत राहावे यासाठी आमचे साहाय्य कर येशूच्या नावात मागतो, आमेन.''

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net